National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) अंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे या संस्थेस Basic Training Provider (BTP) म्हणून मान्यता देणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

## शासन निर्णय क्रमांकः आयटीआय-२०१८/प्र.क्र.१५६/व्यशि-३

चौथा मजला, मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०४ ऑक्टोंबर, २०१८

<u>संदर्भ</u> :-

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एटीएस/२०१८/प्र.क्र.११/१९७, दिनांक १४/०८/२०१८

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एटीएस/२०१८/प्र.क्र.११/२३४, दिनांक २७/०९/२०१८.

**<u>प्रस्तावना :</u>**

National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) अंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे या संस्थेस Basic Training Provider (BTP) म्हणून रासायनिक क्षेत्रातील Attendant Operator (Chemical Plant), Instrument Mechanic (Chemical Plant), Maintenance Mechanic (Chemical Plant) या तीन अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या पाळीतील तुकडीमध्ये Basic Training देण्यासाठी मान्यता देण्याबाबत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी संदर्भिय पत्रांन्वये शासनास विनंती केली होती. त्यानुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे या संस्थेस Basic Training Provider (BTP) म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) अंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे या संस्थेस Basic Training Provider (BTP) म्हणून रासायनिक क्षेत्रातील Attendant Operator (Chemical Plant), Instrument Mechanic (Chemical Plant), Maintenance Mechanic (Chemical Plant) या तीन अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या पाळीमधील एका तुकडीत प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये ऑक्टोंबर, जानेवारी, एप्रिल या तीन सत्रात Basic Training

सुरू करण्यास या शासन निर्णयान्वये खालील अटीं व शर्तीचे अधिन राहून तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

१. National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) अंतर्गत Basic Training Provider यांचे करीता केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

२. Basic Training Provider (BTP) म्हणून Basic Training देण्याकरीता आवश्यक असलेले मनुष्यबळ कायमस्वरूपी तासिका तत्वावर उपलब्ध करून घेण्यात यावे. सदर मनुष्यबळाचे मानधन हे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशकांना सैंध्दातिंक व प्रात्यक्षिकांच्या प्रति तासिकांसाठी अनुज्ञेय असलेल्या मानधना इतके राहील.

३. National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) अंतर्गत Basic Training Provider यांना Basic Training देण्यासाठी रूपये ७,५००/- (५०० तास/३ महिने) प्रति विद्यार्थी इतके केंद्र शासनाकडून जे मानधन मिळणार आहे, त्या मानधनातूनच Basic Training Provider (BTP) साठी येणारा संपूर्ण खर्च भागविण्यात यावा. याकरीता राज्य शासनाकडून कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

४. संस्थेतील Attendant Operator (Chemical Plant), Instrument Mechanic (Chemical Plant), Maintenance Mechanic (Chemical Plant) या अभ्यासक्रमांच्या उपलब्ध इमारत (जागा) व यंत्रसामुग्रींचा विनियोग करून Basic Training देण्यात यावे. तथापि, शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रशिक्षणावर कोणताही परिणाम होणार नाही याची प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८१००४१२३३४३७९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2018.10.04 12:35:39 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,

३. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई

७. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई.

८. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, रायगड

९. प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे, जिल्हा रायगड.

**प्रत,**

१. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

२. मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

४. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

५. मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहाय्यक

६. उप सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई

७. निवड नस्ती (व्यशि-३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग.